क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.१०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२ दिनांक ५ / ७ / २००६

विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत 'रेनकोट' साठी पात्र कर्मचाऱ्यांना 'रेनसूट' पुरविणेबाबत.

संदर्भ : १) संहिताबध्द सर्व साधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२
२) परिपत्रक क्र.साप्रवि/सामान्य/१७२०,दि १०.६.१९९९.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.१५ दि.९.१.२००६.

.......

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ अनुसार पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील ठराविक कर्मचाऱ्यांना 'रेनकोट' पुरविला जात होता. पावसाळयामध्ये काम करताना वापरण्यात सुलभता व सुरक्षितता असावी या दृष्टीने म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचनेनंतरच्या महावितरण कंपनीतील संचालन व सुव्यवस्था मंडलांमध्ये फक्त तारमार्गावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' द्यावा अशा सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र.१५ दि.९.१.२००६ अन्वये प्रसृत करण्यात आल्या आहेत.

२. तथापि, संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ अनुसार जे कर्मचारी पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाकडून 'रेनकोट'साठी पात्र आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांना महावितरण कंपनीकडून 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' पुरविण्यात यावा अशी मागणी विविध संघटनांच्या वतीने करण्यात आली होती.

३. या संदर्भात सर्वंकष विचार करुन संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून व्यवस्थापकीय संचालक यांनी, म.रा.वि.वितरण कंपनीतील जे कर्मचारी संहिताबध्द आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ अनुसार 'रेनकोट' पुरविण्यासाठी पात्र आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांना 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' पुरविण्यासाठी मंजुरी दिली आहे.

४. यानुसार संदर्भिय परिपत्रक क्र. १७२० दि.१०.६.१९९९ मध्ये प्रसृत केलेल्या सूचनांच्या धर्तीवर महावितरण कंपनीकडून 'रेनकोट' मिळण्यास पात्र असणारे कर्मचारी 'रेनसूट'ची खरेदी करुन त्याची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र रहातील.

५. सदर 'रेनसूट' ची किंमत कमाल रु.५५०/- (रुपये पाचशे पन्नास फक्त) पर्यंतच असावी.

६. परिपत्रक क्र.साप्रवि/सामान्य/१७२०,दिनांक १०.६.१९९९ मध्ये प्रसृत करण्यात आलेल्या इतर सूचना अबाधित रहातील.

७. 'रेनसूट' २ वर्षाच्या प्रत्येक गटवर्षाकरिता द्यावयाचा असून चालू गटवर्ष २००६-२००८ असे धरले जावे.

*( सु.य.पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वी.वितरण कंपनी मर्यादितच्या प्रेषण यादीनुसार

*K/Adm.Cir.- Uniform*
*21/6/06*